दैनिक
# लोकपत्र
भूमिपुत्रांचा मित्र!

मंगळवार, दि. २१ ऑक्टोबर २०१४

## बालकामगार विद्यार्थ्यांना डॉएच्च बँकेचा मदतीचा हात



औरंगाबाद / प्रतिनिधी

आझाद अली शाह शिक्षण संस्था (एनजीओ) खडकेश्वर, औरंगाबाद यांच्याद्वारे संचलित राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प शाळा मिस्बाह कॉलोनी, पडेगाव औरंगाबाद. निसर्ग कॉलोनी, लालमाती, भावसिंगपुरा, औरंगाबाद या शाळांतील सर्व बालकामगार विद्यार्थ्यांना नोटबुक, पालकांसाठी जुने कापडे आणि स्कूलबॅगचे वाटप करण्यात आले. हे सर्व साहित्य समाजातील गरीब आणि गरजू लोकांच्या मुलांना शिक्षणात येणाऱ्या अडचणींचा विचार करून डॉएच्च बँकेच्यावतीने देण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉएच्च बँकेचे एरिया मॅनेजर राजीव गुप्ता, विशाल घमरकर, मुश्ताक शेख, पंकज दीक्षित, कौस्तुभ कुलकर्णी, शशांक गोस्वामी, सत्यप्रकाश दुबे, जैस्वाल सुनील हे बँकेचे कर्मचारी उपस्थित होते तर संस्थेच्या अध्यक्षा खान सुरैय्या आणि संस्थेचे प्रशासकीय अधिकारी साजिद पाशा उपस्थित होते.

सर्वप्रथम आलेल्या पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर शिक्षिका शुभांगी कुलकर्णी यांनी संस्थेचा व शाळेचा अहवाल वाचून दाखविला. नंतर आलेल्या पाहुण्यांनी आपल्या हाताने सर्व गरजु व गरीब विद्यार्थ्यांना नोटबुक, कपडे, आणि स्कूलबॅगचे वाटप केले.

त्यानंतर प्रशासकीय अधिकारी साजिद पाशा यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व सांगितले व डॉएच्च बँकेच्या कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांसाठी दिलेल्या योगदानाचे आभार मानून ही मदत या विद्यार्थ्यांचे भविष्य बदलण्यात महत्त्वाची भूमिका बजावू शकते असे आपले मत मांडले.

यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष राजीव गुप्ता यांनी आपल्या भाषणात संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे योगदान हे समाजाच्या उन्नतीसाठी मोलाचे असल्याचे कबूल करून आपण शिक्षणापासून वंचित असलेल्या लोकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे पवित्र काम करत असल्याचे सांगितले व विद्यार्थ्यांना शिक्षणाची कास सोडू नका आणि आपले दारिद्र्य हे शिकून दूर करा असा मोलाचा सल्ला दिला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शेख आरिफ यांनी केले तर आभारप्रदर्शन रत्नमाला सुरडकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पटेल मुकीम, सय्यद नसरीन, सैय्यद झीनत, शेख फरहिन, रिजवाना मन्सुरी, सैय्यदा अफसर, सैय्यदा रुबी, माया आवाड, सोनम गंगावने, अमरीन शेख, सुषमा गवई, मीना भालेराव, छाया देहरे आदींनी परिश्रम घेतले व विद्यार्थ्यांना खाऊ वाटून कार्यक्रमाची सांगता झाली.